UNDER THE AEGIS OF

MIT-SOG MIT School of Government
Since 2005
Bharat's First School to Create Future Political Leaders

SUPPORTED BY

राष्ट्रीय सरपंच संसद



2 दिवसीय परिषद

# महाराष्ट्र युवा संसद 2026

## MAHARASHTRA YOUTH PARLIAMENT

**दिनांक: 02 व 03 मे 2026**

**स्थळ: विश्वधर्मी मानवता तीर्थ, रामेश्वर, लातूर**



## धोरणनिर्मितीत युवकांची भूमिका:

महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक विषमता दूर करत ग्रामीण-शहरी भविष्याचा सेतू निर्माण

SUPPORTED BY

भारतीय छात्र संसद

unesco Chair

bharatiyachhatrasansad.org | mitsog.org

# परिषद थीम

महाराष्ट्राचा विकास प्रवास हा उल्लेखनीय प्रगती आणि गुंतागुंतीच्या प्रादेशिक वैविध्याने चिन्हांकित झालेला आहे. भारतातील आर्थिकदृष्ट्या सर्वाधिक गतिशील राज्यांपैकी एक म्हणून महाराष्ट्राने उद्योग, शिक्षण आणि शहरी विकासाचे प्रमुख केंद्र म्हणून स्थान निर्माण केले आहे. तथापि, ही प्रगती सर्वत्र समानरीत्या पोहोचलेली नाही; जिल्हे, गावे आणि ग्रामीण - शहरी पातळीवर अंतर्गत प्रादेशिक विषमता स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे आव्हान केवळ या तफावतींची नोंद घेण्यापुरते मर्यादित नसून, विद्यमान सामर्थ्यांवर आधार घेत अधिक संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाचे मार्ग निर्माण करण्याचे आहे.

नीती आयोग, केंद्रीय भूजल मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्या अहवालांमधून या वास्तवाचे दोन्ही पैलू समोर येतात. मराठवाडा विभागातील लातूरसारख्या जिल्ह्यांना पाणीटंचाई, हवामानातील अनिश्चितता आणि शेतीवरील वाढता ताण अशा संरचनात्मक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. तरीही, याच प्रदेशांनी उल्लेखनीय जिद्द आणि नवकल्पनांची उदाहरणेही सादर केली आहेत - समुदायाच्या सहभागातून जलसंवर्धन आणि जलसंधारण उपक्रम, स्वयं-सहायता गटांची बळकटी, तसेच स्थानिक स्वराज्य व्यवस्थेतील उपक्रम यांद्वारे.

राज्याच्या बदलत्या विकास परिदृश्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे वाढता ग्रामीण–शहरी सलगपणा. विस्तारत जाणारी शहरे, उपनगरी (peri-urban) क्षेत्रे आणि नव्याने उदयास येणारे आर्थिक मार्ग (corridors) यांमुळे संधी आणि अपेक्षांचे स्वरूप बदलत आहे. या प्रक्रियेमुळे पायाभूत सुविधांवरील ताण आणि असमान प्रवेश यांसारखी आव्हाने निर्माण होत असली, तरी त्याचबरोबर उपजीविकेच्या विविध संधी, नवोन्मेष आणि प्रादेशिक एकात्मतेच्या नव्या शक्यता देखील उभ्या राहत आहेत. या बदलांना प्रतिसाद देण्यासाठी पारंपरिक "ग्रामीण–शहरी" भेदांच्या पलीकडे जाऊन संदर्भ-संवेदनशील आणि एकात्मिक धोरणात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर युवक हे भविष्य घडविणारे एक महत्त्वाचे शक्तिकेंद्र म्हणून उदयास येतात. शिक्षण, डिजिटल साधने आणि सामाजिक नेटवर्क्स यांच्या बळावर युवक धोरणे आणि तळागाळातील वास्तव यांमध्ये प्रभावी दुवा निर्माण करू शकतात. मात्र, या सहभागाला दिशा देण्यासाठी सक्षम आणि विश्वासार्ह व्यासपीठांची आवश्यकता असते. डॉ. राहुल व्ही. कराड यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्या 'भारतीय विद्यार्थी संसद' आणि 'राष्ट्रीय सरपंच संसद' यांसारख्या उपक्रमांनी गेल्या काही वर्षांत युवक आणि ग्रामीण नेतृत्वाला लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रभावी मंच उपलब्ध करून दिले आहेत. या उपक्रमांमुळे केवळ संवाद नव्हे, तर विचारमंथन, नेतृत्व आणि तळागाळातील मुद्द्यांचे धोरणात्मक रूपांतर घडून येण्यास चालना मिळाली आहे.

महाराष्ट्र युवा संसद २०२६ ही अशाच लोकशाही प्रेरणेतून उभी राहिलेली पुढील पायरी आहे-जी पुरावे, प्रत्यक्ष अनुभव आणि युवकांच्या दृष्टीकोनांना एकत्र आणत अर्थपूर्ण व परिणामकारक संवाद घडवून आणेल. आव्हाने आणि संधी यांचा समतोल साधत, ही परिषद सहभागात्मक, सर्वसमावेशक आणि प्रदेश-संवेदनशील विकासाच्या दिशेने विचारमंथन घडवून आणण्याचा प्रयत्न करेल. या प्रक्रियेत युवक हे केवळ श्रोते किंवा लाभार्थी न राहता, अधिक न्याय्य, संतुलित आणि सशक्त महाराष्ट्र घडविणारे सक्रिय सहनिर्माते म्हणून पुढे येतील-आणि अशा लोकशाही उपक्रमांची परंपरा अधिक व्यापक पातळीवर रुजवतील.





**सत्र १: लातूर एका वळणावर:**
**जिल्हास्तरीय विषमता आणि विकासातील तफावत**



**सत्र २: ग्रामीण महाराष्ट्र:**
**गावांमधील अंतर्गत प्रादेशिक विषमता**



**सत्र ३: शहरी महाराष्ट्र:**
**असमतोल वाढ आणि उदयोन्मुख विषमता**



**सत्र ४: बदलाचे प्रवर्तक म्हणून युवा -**
**नेतृत्व, नवोपक्रम आणि सहभाग**



**सत्र ५: संतुलित विकासासाठी धोरणे:**
**महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक तफावत कमी करण्याचे मार्ग**

## परिषदेची उद्दिष्टे



1. महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक विषमतेविषयी - जिल्ह्यांतील, विभागांतील तसेच ग्रामीण–शहरी पातळीवरील असमतोल, या संदर्भात युवकांना लोकशाही संवादात सक्रियपणे सहभागी करून घेणे.
2. विविध प्रदेशांतील विकासातील तफावतांचा चिकित्सक आढावा घेणे, विशेषतः संसाधने, पायाभूत सुविधा, उपजीविका आणि प्रशासन यांमधील असमान प्रवेशावर लक्ष केंद्रित करणे.
3. युवकांना धोरणनिर्मितीत योगदान देणारे आणि परिवर्तन घडविणारे घटक म्हणून सक्षम करणे, जेणेकरून ते सर्वसमावेशक, प्रदेश-संवेदनशील आणि संतुलित विकासासाठी कृतीयोग्य मार्ग सुचवू शकतील.

## प्रस्तावित कार्यक्रम

| दिवस १: अंतर्गत प्रादेशिक वास्तवांचे आकलन | |
|---|---|
| 10:00am to 11:00am | **नोंदणी:** • सहभागींची नोंदणी व स्वागत • सहभागींचे नेटवर्किंग व संवाद |
| **उद्घाटन सत्र (Inaugural Session)**<br>11:00 am to 01:00pm | • **स्वागतपर भाषण**<br>• प्रास्ताविक व परिषद परिचय<br>• प्रारंभिक उद्गार: असमानतेला सामोरे जाण्यात युवकांची लोकशाही भूमिका<br>• प्रमुख व्याख्यान: महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक विषमता – पुढील दिशा<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **सुनेत्रा अजित पवार,** उपमुख्यमंत्री आणि क्रीडा व युवा कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य<br>• **रक्षा खडसे,** युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, भारत<br>• **रामराजे नाईक निंबाळकर,** सदस्य, विधान परिषद महाराष्ट्र<br>• **डॉ. अरोकियास्वामी वेलुमणी,** संस्थापक - थायरोकेअर टेक्नॉलॉजीज लि.<br>• **श्री. शिवेंद्र राजे भोसले,** पालकमंत्री, लातूर<br>• **श्रीमती नीलम गोऱ्हे,** सदस्य, विधान परिषद महाराष्ट्र<br>• **पद्मश्री पोपटराव पवार,** सरपंच - हिवरेबाजार, अहिल्यानगर |
| 01:00 to 2:30pm | **दुपारचे जेवण** |
| **सत्र १:**<br>**लातूर एका वळणावर: जिल्हास्तरीय विषमता आणि विकासातील तफावत**<br>02:30pm to 04:00pm | **केंद्रबिंदू:**<br>• लातूर जिल्ह्यातील असमान विकास (ग्रामीण, उपनगरी आणि शहरी भागांमधील तफावत)<br>• पाणी उपलब्धतेतील विषमता आणि हवामान बदलाची असुरक्षितता<br>• कृषी संकट विरुद्ध उदयास येणारे आर्थिक विकासाचे केंद्र<br>• युवकांचे स्थलांतर आणि स्थानिक रोजगारातील तफावत<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **श्री. राहुल कुमार मीणा,** मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)<br>• **सौ. सरिता कौशिक,** कार्यकारी संपादक, एबीपी माझा<br>• **राहुल कुलकर्णी,** पत्रकार, NDTV-मराठी<br>• **डॉ. भरत बस्तेवाड,** जिल्हाधिकारी, लातूर<br>• **नितीन बानुगडे पाटील,** प्रेरणादायी वक्ते, लेखक, इतिहास अभ्यासक<br>• **श्री. मकरंद अनासपुरे,** नाम फाऊंडेशन |
| 04:00 to 04:30pm | **नेटवर्किंग विश्रांती** |
| **सत्र २:**<br>**ग्रामीण महाराष्ट्र: गावांमधील अंतर्गत प्रादेशिक विषमता**<br>04:30 to 06:00pm | **केंद्रबिंदू:**<br>• एकाच प्रदेशातील विविध गावांतील विकासातील फरक<br>• मूलभूत सेवांपर्यंत पोहोच (आरोग्य, शिक्षण, पाणी)<br>• सामाजिक विषमता (जात, लिंग, जमीन मालकी)<br>• पंचायती राज संस्थांच्या कार्यक्षमतेतील फरक<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **डॉ. अभय बंग** (शोध, गडचिरोली), ग्रामीण आरोग्य, समुदाय आधारित विकास<br>• **श्री. संतोष जाधव,** सह-संस्थापक, 'इंडियन फार्मर' (Indian Farmer)<br>• **श्री. राहुल कुलकर्णी,** पत्रकार, एनडीटीव्ही-मराठी<br>• **श्री. रोहित रावसाहेब पाटील,** सदस्य, विधानसभा महाराष्ट्र<br>• **श्री. प्रदीप लोखंडे,** संस्थापक - ग्रामीण संबंध, 'पोस्टकार्ड आणि लायब्ररी मॅन ऑफ इंडिया' |
| 06:00 to 06:15pm | **नेटवर्किंग विश्रांती** |
| 06:15 to 07:30pm | **सांस्कृतिक कार्यक्रम** |
| 07:30 to 08:30pm | **रात्रीचे जेवण \| पहिल्या दिवसाचा समारोप** |

## दिवस २: महाराष्ट्रातील धोरणांची रूपरेषा – अंतर आणि शक्यता

| | |
|---|---|
| **सत्र ३:**<br><br>**शहरी महाराष्ट्र: असमतोल वाढ आणि उदयोन्मुख विषमता**<br><br>**8:30 to 10:00am** | **केंद्रबिंदू:**<br>• टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील विकासातील तफावत<br>• अनौपचारिक वसाहती विरुद्ध नियोजित शहरी क्षेत्रे<br>• पायाभूत सुविधांतील असमानता आणि सेवा पुरवठ्यातील तफावत<br>• स्थलांतराचा ताण आणि शहरी वगळलेपण<br>• धोरण रचना आणि प्रत्यक्ष परिणाम यांतील दरी कमी करणे<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **विवेक फणसाळकर,** माजी पोलीस आयुक्त, मुंबई<br>• **आशुतोष गोवारीकर,** भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि अभिनेते<br>• **राजीव खांडेकर,** वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष, वृत्त आणि निर्मिती, एबीपी न्यूज आणि एबीपी माझा<br>• **श्री. हनुमंतराव गायकवाड,** अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, बीव्हीजी इंडिया लिमिटेड<br>• **सत्यजीत तांबे पाटील,** सदस्य, विधान परिषद महाराष्ट्र |
| **10:00 to 10:30 am** | **नेटवर्किंग विश्रांती** |
| **सत्र ४:**<br><br>**बदलाचे प्रवर्तक म्हणून युवा – नेतृत्व, नवोपक्रम आणि सहभाग**<br><br>**10:30am to 12noon** | **केंद्रबिंदू:**<br>• शासन आणि निर्णय प्रक्रियेत युवकांचा सहभाग<br>• ग्रामीण उद्योजकता आणि स्टार्ट-अप परिसंस्था<br>• डिजिटल साधने, नागरिक सहभाग आणि जागरूकता<br>• महाराष्ट्रातील युवक-नेतृत्वाखालील उपक्रमांची प्रकरणे<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **श्रीमती. प्रणिती शिंदे,** सदस्या, लोकसभा, भारत<br>• **श्री. श्रीपाल सबनीस,** मराठी लेखक, समीक्षक आणि विचारवंत<br>• **श्री. सदानंद श्रीधर मोरे,** इतिहासकार आणि मराठी लेखक- कवी<br>• **श्री. राजू परुळेकर,** लेखक, ब्लॉगर, कवी आणि राजकीय विश्लेषक<br>• **श्री. अविनाश धर्माधिकारी,** IAS , माजी उपसचिव, मुख्यमंत्री महाराष्ट्र |
| **12noon to 1:30pm** | **दुपारचे जेवण** |
| **सत्र ५:**<br><br>**संतुलित विकासासाठी धोरणे: महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक तफावत कमी करण्याचे मार्ग**<br><br>**01:30 to 3:00pm** | **केंद्रबिंदू:**<br>• ग्रामीण–शहरी धोरणांमधील तफावत<br>• प्रदेश-विशिष्ट नियोजन दृष्टिकोनाची गरज<br>• विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका<br>• सर्वसमावेशक धोरणनिर्मिती आणि अंमलबजावणीत युवकांचा सहभाग<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **श्री. अमोल रामसिंग कोल्हे,** सदस्य, लोकसभा, भारत<br>• **श्री. हनुमंत केंद्रे,** “मराठवाचे जलदूत”, लोकसहभागातून जलव्यवस्थापन<br>• **निलीमा मिश्रा,** पद्मश्री आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार<br>• **श्री. संकर्षण कऱ्हाडे,** अभिनेते-कवी<br>• **श्री. मिलिंद प्रल्हाद कांबळे,** उद्योजक, संस्थापक, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (DICCI)<br>• **श्री. राजू परुळेकर,** लेखक, ब्लॉगर, कवी आणि राजकीय विश्लेषक<br>• **श्री. नरेंद्र जाधव,** अर्थशास्त्रज्ञ आणि राज्यसभेचे माजी सदस्य |
| **समारोप सत्र (Valedictory Session)**<br><br>**03:00 to 05:00pm** | • “संतुलित विकासासाठी महाराष्ट्र युवा संसद जाहीरनामा” सादरीकरण<br>• अंतर्गत प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी युवकांच्या शिफारसी<br>• समारोपपर भाषण: समतोल आणि सर्वसमावेशक महाराष्ट्राकडे वाटचाल<br>• आभार प्रदर्शन<br>**प्रस्तावित वक्ते:**<br>• **श्रीमती सुप्रिया सुळे,** सदस्या, लोकसभा, भारत<br>• **श्री. नाना पाटेकर,** अध्यक्ष, NAAM फाउंडेशन<br>• **श्री. मनोज नरवणे,** माजी लष्करप्रमुख, भारतीय लष्कर<br>• **श्री. कुमार केतकर,** भारतीय लेखक, राजकारणी आणि माजी पत्रकार<br>• **श्री. सुभाष पालेकर,** भारतीय कृषितज्ज्ञ<br>• **श्री. सदानंद मोरे,** लेखक आणि कवी<br>• **श्री. दिलीप वळसे पाटील,** सदस्य, विधानससभा महाराष्ट्र |
| | **परिषद समापन** |

Register Now

**स्थळ: विश्वधर्मी मानवता तीर्थ, रामेश्वर, लातूर**

**संपर्क:**

**ईमेल:**